# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (शिक्षण विभाग)

Landline No.0712-2567028
E-mail ID - education.nmc@gmail.com

जा.क्र. 129 / शि.वि. / 2017 दि.15 / 03 / 2017

**स्मरणपत्र - 2**

प्रती,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य.शाळा, म.न.पा. नागपूर.

**विषय : आपले शाळेतील विद्यार्थ्यांना बुट व मोजे खरेदी करण्यास्तव केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याबाबत.**

**संदर्भ :** 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग निर्णय क्र.डिसीटी 2316/प्र.क्र.133/का.1417, दि.05.12.2016

2. क्र.3466/शि.वि./2017, दि.04.01.17
3. क्र.3518/शि.वि./2017, दि.11.01.17
4. क्र.3633/शि.वि./2017, दि.27.01.17

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयान्वये व कार्यालयीन पत्रान्वये आपणांस यापूर्वीच आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रिया राबवून बुट व मोजे खरेदी करण्याच्या सुचना तसेच याबाबतची कार्यवाही करण्याबाबत सुचीत करण्यात आले होते. यापूर्वीच्या पत्रांमध्ये नमुद कार्यप्रणालीचा वापर करुन विद्यार्थ्यांना स्वतः च्या स्तरावर बुट/मोजे खरेदी करुन त्याची प्रमाणित देयके मुख्याध्यापक यांच्या प्रमाणिकरणासह विभागास दि.15.02.17 पर्यंत सादर करावयाची होती. DBT योजनेचे हे प्रथम वर्ष असून अशाप्रकारच्या खरेदीचा प्रयत्नदेखील पहिलाच असल्यामुळे यात आपणांस अडचण येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यामुळे प्रस्तुत पत्र प्राप्त होताच DBT योजनेंतर्गत खरेदी प्रक्रियेस विद्यार्थी व त्यांचे पालक यांचेकडून मिळालेल्या प्रतिसादाच्या अनुषंगाने आपला सर्वंकष अहवाल शिक्षण विभाग कार्यालयास 24 तासाचे आत सादर करावा. जेणेकरुन प्रस्तुत खरेदीच्या अनुषंगाने शिक्षण विभागास वरिष्ठांना अहवाल सादर करणे सुलभ होईल.

(फारुक अहमद खान)
शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी,

१. शाळा निरीक्षक, झोन क्र.१ते१०, म.न.पा., नागपूर यांनी आपले स्तरावर अधिनस्थ शाळांना सुचित करु अहवाल प्राप्त करायच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत.

PC 3 PI etter&Note Letter21.doc